**ठळक बातम्या**

- मुंबईत मराठी माणसांसाठी घरांचे ५० टक्के आरक्षण ठेवण्याबाबतचं धोरण निश्चित करण्याचं राज्य सरकारचं आश्वासन

- गणेशोत्सव हा सण राज्य महोत्सव म्हणून घोषित करण्याची सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांची विधानसभेत ग्वाही

- मुंबईत मशीद बंदर स्थानकाजवळच्या सिंदूर पुलाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांना कर्ज वसुलीच्या योग्य पद्धती वापरात आणण्याची केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची सूचना

**आणि**

- बेकायदेशीर बेटिंग ॲप्लिकेशन्सना प्रोत्साहन दिल्याबद्दल ईडीकडून २९ जणांविरोधात गुन्हा दाखल, आरोपींमध्ये प्रसिद्ध कलाकारांचा समावेश

**<><><><>**

मुंबईतल्या नवीन इमारतींमध्ये, मराठी माणसांसाठी घरांचं ५० टक्के आरक्षण ठेवण्याबाबतचं धोरण निश्चित केलं जाईल, असं आश्वासन शंभूराज देसाई यांनी विधान परिषदेत दिलं.

एखाद्या ठिकाणी मराठी माणसाला घर नाकारलं जात असेल तर त्या बिल्डरवर निश्चित कारवाई केली जाईल, असंही देसाई यांनी सांगितलं. आमदार मिलिंद नार्वेकर यांनी तारांकित प्रश्नांद्वारे हा मुद्दा उपस्थित केला होता. मुंबईतील नवीन इमारतीत मराठी माणसांसाठी ५० टक्के घरांचे आरक्षण ठेवण्याबाबतचा कायदा करणार का, असा उपप्रश्न, आमदार अनिल परब, सचिन अहिर यांनी उपस्थित केला. यावेळी महाविकास आघाडी सरकारच्या, अडीच वर्षांच्या काळात असा कायदा का केला नाही, असा मुद्दा मंत्री शंभूराज देसाई यांनी मांडला. याला विरोधी पक्षाच्या आमदारांनी आक्षेप घेतला. यावेळी झालेल्या गदारोळात सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब करण्यात आलं होतं.

**<><><><>**

महाराष्ट्राला गणेशोत्सवाची शंभर वर्षांची समृद्ध परंपरा असून हा सण राज्य महोत्सव म्हणून हे सरकार घोषित करेल, अशी ग्वाही सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आज विधानसभेत दिली. पुण्याच्या कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्द्याला ते उत्तर देत होते. या उत्सवात विविध अडथळे आणण्याचे, न्यायालयांमध्ये जाण्याचे सगळे प्रयत्न दूर करायला आपलं सरकार वचनबद्ध असून जितका हवा तितका निधी या उत्सवासाठी उपलब्ध करून देऊ, असं आश्वासन त्यांनी दिलं. गणेशोत्सव मंडळांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, आपल्या देखाव्यांमध्ये भारतीय सैन्य, महाराष्ट्राने विविध क्षेत्रांमध्ये मिळवलेलं यश अधोरेखित करावं, त्यांना काहीही कमी पडू दिलं जाणार नाही, असंही शेलार यांनी नमूद केलं.

**<><><><>**

शहापूर इथं एका शाळेत मुख्याध्यापकांनी मासिक पाळी आलेल्या मुलींची चुकीच्या पद्धतीने तपासणी केल्या प्रकरणी कडक कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मंत्री गिरीश महाजन यांनी आज विधानसभेत ही माहिती दिली. काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी आज विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला. हे प्रकरण अतिशय गंभीर असून शासनानं याची दखल घ्यावी, असे निर्देश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले.

जालना जिल्ह्यात सन २०२२ ते २०२४ या कालावधीत नैसर्गिक आपत्तीपोटी शेतकऱ्यांना देण्याच्या अनुदानात घोटाळा झाल्याचे आरोप अतिशय गंभीर स्वरूपाचे असून सर्व संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी विहित कालावधीत पूर्ण करून, दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करू, असं आश्वासन कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी आज विधानसभेत दिलं.

एक रुपयात विमा या योजनेत विमा कंपन्यांना सुमारे साडे सात हजार कोटी रुपयांचा नफा झाला आहे, त्या मानानं शेतकऱ्यांना हवा तसा लाभ मिळाला नाही त्यामुळे पुन्हा जुनी पीक विमा योजना राबविण्यात येत आहे अशी माहिती कृषि मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली, याबाबतची लक्षवेधी सूचना राजेश विटेकर यांनी उपस्थित केली होती. जुन्या विमा योजनेमुळे साधारण पणे साडे चार ते पाच हजार कोटी रुपये वाचतील, अशी माहिती देखील

मंत्री कोकाटे यांनी दिली. ज्या शेतकऱ्यांनी अवकाळी पावसाने नुकसान झाल्याची तक्रार केली आहे, त्या सर्व शेतकऱ्यांना मदत दिली जाईल अशी माहिती मंत्री कोकाटे यांनी दिली.

राज्य सरकार आज महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक विधानसभेत मांडणार आहे. आजच्या दिवसाच्या कामकाजात याचा उल्लेख करण्यात आला आहे. यापूर्वी हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवण्यात आलं होतं. या समितीच्या ५ बैठका झाल्या. या समितीच्या कामकाजाचा अहवाल महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल विधानसभेत सादर केला होता. सुमारे १२ हजार नागरिकांनी समितीकडे त्यांची मते पाठविली होती. समिती सदस्यांच्या सूचनांनुसार विधेयकात बदल केल्याचं बावनकुळे काल म्हणाले होते.

दरम्यान, गिरणी कामगारांना मुंबईत घर मिळावं अशी महायुती सरकारची इच्छा असून याबाबत लवकरच निर्णय घेऊ, असं आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी दिलं. विधानभवन परिसरात ते वार्ताहरांशी बोलत होते. मुंबईत आझाद मैदानावर सुरू असलेल्या गिरणी कामगारांच्या आंदोलनाच्या संदर्भात ते बोलत होते.

**<><><><>**

मुंबईत मशीद बंदर स्थानकाजवळच्या सिंदूर या उड्डाणपुलाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज लोकार्पण झालं. दीडशे वर्षांपासून या पुलाला कर्नाक पूल म्हणून ओळखलं जायचं. कर्नाक हा ब्रिटीश गव्हर्नर भारतीयांना फसवणारा आणि अत्याचार करणारा असल्यामुळे त्याच्या काळ्या इतिहासाच्या खुणा पुसण्यासाठी कर्नाक पुलाचं सिंदूर हे नामकरण केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

- **बाईट- देवेंद्र फडणवीस , मुख्यमंत्री -**

- **<><><><>**

बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांच्या कर्ज वसुलीच्या पद्धती निष्पक्ष, सहानुभूतीपूर्ण आणि आदरयुक्त पद्धतीने राबवल्या जायला हव्यात, आणि त्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निष्पक्ष व्यवहार संहितेशी काटेकोरपणे सुसंगत असायला हव्यात, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मल सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या काल नवी दिल्ली इथं बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांच्या परिषदेला संबोधित करत होत्या. आर्थिक समावेशन हे आर्थिक शोषणाचं माध्यम म्हणून वापरलं जाऊ नये, असं त्या यावेळी म्हणाल्या.

कर्ज वितरण हे ग्राहकांच्या रास्त गरजा आणि कर्ज परतफेडीच्या क्षमतेवर आधारित असायला हवं यावर त्यांनी भर दिला. कर्जाचं आक्रमकपणे मार्केटिंग करून ते कोणावर लादलं जाऊ नये, तसंच व्याजदर वाजवी असायला हवा असं त्यांनी सांगितलं.

बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांनी आपल्या नीतिमत्तेचा भाग म्हणून प्रशासन, जोखीम व्यवस्थापन आणि ग्राहक संरक्षणाला महत्वाचं स्थान द्यायला हवं असं सीतारामन यांनी नमूद केलं.

**<><><><>**

बेकायदेशीर बेटिंग ॲप्लिकेशन्सना प्रोत्साहन दिल्याबद्दल ईडी, अर्थात सक्तवसुली संचालनालयानं २९ जणांविरोधात मनी लाँड्रिंगचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपींमध्ये अभिनेताविजय देवरकोंडा, राणा दग्गुबती, प्रकाश राज, निधी अग्रवाल आणि प्रणिता सुभाष यांच्यासह इतर प्रभावशाली व्यक्ती आणि युट्युबर्स चा समावेश आहे. तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात दाखल झालेल्या पाच एफआयआरच्या आधारावर मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत त्यांची चौकशी सुरू आहे.

या प्रकरणी सशुल्क जाहिरातींद्वारे मोठ्या रकमेच्या लाँडरिंगमध्ये सहभाग असणाऱ्या, जंगली रमी, A23, JeetWin, पॅरिमॅच आणि लोटस३६५ यासारख्या व्यासपीठांना आरोपींनी प्रोत्साहन दिल्याचा ईडी चा संशय आहे. याचा पुढील तपास सुरू आहे.

**<><><><>**

देशभरात आज गुरुपौर्णिमेचा सण साजरा होत आहे. अज्ञानातून ज्ञानाकडे घेऊन जाणाऱ्या गुरुजनांच्या चरणी कृतज्ञतेचं वंदन करण्याचा हा दिवस आहे. या निमित्तानं सर्वत्र गुरुपूजनासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. शिर्डीमध्ये श्री साईबाबा संस्थानचा उत्सव भक्तिभावात सुरू आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><>**

अँडरसन तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा कसोटी सामना आज दुपारी साडे तीन वाजल्यापासून लॉर्ड्स मैदानावर होणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत आणि इंग्लंड या संघांनी १-१ अशा बरोबरी साधली आहे.

तत्पूर्वी इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><>**

विदर्भात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये पुरामुळे सुमारे १७ राष्ट्रीय, राज्य आणि इतर रस्ते बंद केले आहेत. गेल्या चार दिवसांपासून गोंदिया जिल्ह्यात संततधार पाऊस पडत असून भातशेती पाण्याखाली आल्याने शेतकरी चिंतेत आहेत. दरम्यान हवामान विभागानं नागपूर जिल्ह्याला आज ऑरेंज अलर्ट दिला आहे.

**<><><><>**

नाशिक जिल्हा परिषदेतल्या महिला कर्मचाऱ्यांचा नाहक छळ करणाऱ्या एका विभाग प्रमुखाला सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. ही कारवाई या विभागातल्या तीस महिला कर्मचाऱ्यांनी तक्रार दाखल केल्यानंतर करण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्याची चौकशी सुरु आहे.  राष्ट्रीय आणि राज्य महिला आयोगानं याप्रकरणाची दखल घेतली आहे.

**//<><><><>//**